वर्ष-०८ अंक-१५ मुंबई, मंगळवार ०१ ते ०७ मार्च - २०२२ पृष्ठ-४
मूल्य २/- रुपये
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

PG 2 विरार हादरले! भरदिवसा रस्त्यात एकाची गोळ्या घालून हत्या

3 → अंगडिया व्यावयायिकांकडे खंडणीची मागणी; वरिष्ठ अधिकाऱ्याविरोधात पुराव्यांचा अभाव

मुंबईत दुर्दैवी घटना; इमारतीचा भाग कोसळून 5 वर्षांच्या मुलाचा मृत्यू, 3 जखमी ← 4

## सोलापुरात माजी महिला ग्रामपंचायत सदस्याची आत्महत्या




सोलापूर : माजी महिला ग्रामपंचायत सदस्या ने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना रविवारी दुपारी उत्तर सोलापूर तालुक्यातील नान्नज येथे घडली आहे. सविता संतोष कोरे असे मयत महिला सदस्याचे नाव आहे. गावातील विहिरीत उडी घेऊन सविता यांनी आपली जीवनयात्रा संपवली. या घटनेमुळे गावात मोठी खळबळ माजली आहे. सविता यांची मानसिक स्थिती ठीक नव्हती. त्यांच्यावर गेल्या तीन महिन्यांपासून मानसोपचार सुरु होते. सविता दुपारी मुलगा झोपला असताना वेडाच्या भरात घरुन निघून गेल्या व गावाशेजारील सोलापूर-बार्शी रस्त्याजवळच्या देवबप्पा या विहिरीत उडी घेत आत्महत्या केली. या घटनेची नोंद उत्तर तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

**पती घरी जेवायला आल्यानंतर घटना उघड**

सविता यांचे पती संतोष हे हॉटेलमधून घरी जेवायला आले असता पत्नी घरात नसल्याचे निदर्शनास आले. त्यावेळी तिचा शेतात तसेच अन्य ठिकाणी शोध घेतला असता विहिरी वरती सविता यांच्या चप्पल दिसून आल्या. यावरून पत्नीने विहिरीत पडून आत्महत्या केल्याचा त्यांना संशय आला. गावातील नागरिक आणि युवकांच्या मदतीने पाण्यात कॅमेरा सोडून शोधाशोध सुरू केली. विहिरीमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी असल्याने महिलेला बाहेर काढण्यात अडथळा निर्माण होत होता.

## प्रेयसीच्या नकारामुळे केला होता आत्महत्येचा प्रयत्न पाच वर्षांनंतर तुरुंगातून झाली सुटका

मुंबई : एकतर्फी प्रेम (One Sided Love) करीत असताना तरुणीने नकार दिल्यानंतर आत्महत्ये (Suicide)चा प्रयत्न करणाऱ्या एका व्यक्तीची पाच वर्षांनंतर तुरुंगातून सुटका झाली. 2017 मध्ये घडलेल्या या विशेष प्रकरणात मुंबईतील दंडाधिकारी न्यायालयाने नुकताच निर्णय दिला आणि आत्महत्येचा प्रयत्न केल्याचा आरोप असलेल्या व्यक्तीची निर्दोष मुक्तता केली. आरोपीवर भारतीय दंड संहिता (IPC) कलम 309 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यामुळे या खटल्याचा निकाल लागेपर्यंत आरोपीला मागील पाच वर्षे तुरुंगात राहावे लागले. मात्र या प्रकरणात त्याच्यावरील आरोप सिद्ध करणारे पुरेसे ठोस पुरावे नसल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने आरोपीला निर्दोष मुक्त केले. IPC कलम 309 मध्ये एक वर्षाच्या साध्या कारावासाची शिक्षा आत्महत्येच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यासाठी असलेल्या भारतीय दंड संहितेतील (IPC) कलम 309 अंतर्गत असे नमूद केले आहे की, जो कोणी व्यक्ती आत्महत्येचा प्रयत्न करेल किंवा असा गुन्हा घडवून गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात न्यायदंडाधिकारी के.एच.ठोंबरे यांनी निकाल दिला.

प्रेमसंबंध तुटल्यामुळे आत्महत्येचा प्रयत्न केल्याचे पुरावे नाहीत रेकॉर्डवर नाहीत. प्रेमसंबंध तुटल्यामुळे आरोपीने आत्महत्येचा प्रयत्न केला हे सिद्ध करण्यासाठी केवळ परिस्थिती पुरेशी नाही. आरोपीने स्वतःला इजा केली आणि स्वतःचे जीवन संपवण्यासाठी



आणण्यासाठी कोणतेही कृत्य करेल, त्या व्यक्तीला एक वर्षापर्यंतच्या मुदतीच्या साध्या कारावासाची शिक्षा होईल. या तरतुदीच्या अनुषंगाने आरोपीवर न्यायदंडाधिकारी ठोंबरे म्हणाले की, आरोपीने स्वतःच्या पोटात चाकूने वार केला किंवा आत्महत्या करण्यासाठी विषारी द्रव्य प्राशन केले असे पुरावे विषारी द्रव्य प्राशन केले हे फिर्यादीने सिद्ध केले पाहिजे होते. या प्रकरणातील फिर्यादी साक्षीदारांपैकी एकाही साक्षीदाराने आरोपीने स्वतःच्या पोटात चाकूने वार करताना किंवा विषारी द्रव्य प्राशन करताना पाहिल्याची साक्ष दिलेली नाही. एकंदरीत आरोपीविरोधातील गुन्हा सिद्ध करण्यासाठी स्पष्ट पुरावे नाहीत. अशा पुराव्यांअभावी आरोपीला निर्दोष मुक्त केले जात आहे, असेही न्यायालयाने नमूद केले.

13 मे 2017 रोजी खार परिसरात राहणाऱ्या व्यक्तीने तरुणीच्या घरासमोर चाकूने वार करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याचे फिर्यादीत म्हटले होते. तपासात असे समोर आले की, 2011 ते 2016 या कालावधीत त्या व्यक्तीचे कॉलेजमधील तरुणीसोबत प्रेमसंबंध होते. न्यायालयात त्या तरुणीने सांगितले की, आरोपी तिच्या घरी आला, त्याने दरवाजा वाजवला आणि आत्महत्येचा प्रयत्न केला. तिने या घटनेबद्दल पोलीस ठाण्यात तक्रार केली होती.

## शेतकरी आंदोलनाचा भडका; संतप्त शेतकऱ्यांनी महावितरणचे कार्यालय पेटवले



शेतकऱ्यांना दिवसा दहा तास वीज मिळावी, या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे आंदोलन सुरू आहे. गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनाकडे सरकारचे दुर्लक्ष होत असल्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी सांगली जिल्ह्यातील कसबे डिग्रज येथील महावितरणचे कार्यालय पेटवले. रविवारी मध्यरात्रीनंतर घडलेल्या या घटनेत महावितरणचे लाखो रुपयांचे नुकसान झाले.

शेतीसाठी दिवसा दहा तास वीज मिळावी, या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांचे गेल्या सात दिवसांपासून कोल्हापुरातील महावितरणच्या कार्यालयासमोर आंदोलन सुरू आहेत.

## अमरावती महामार्गावर भीषण अपघात; अपघातात रिक्षाचालकाचा जागीच मृत्यू

वाशिम : जिल्ह्यातून एक भीषण अपघाताची (Accident) घटना समोर आली आहे. ट्रक आणि मालवाहू ऑटोरिक्षामध्ये (Rickshaw) भीषण अपघात झाला. या घटनेत ऑटोरिक्षा चालकाचा जागीच मृत्यू झाला आहे. वाशिम जिल्ह्यातील अमरावती (Amravati) महामार्गावर असलेल्या शेलू वाडा परिसरात हा अपघात घडला. अपघात एवढा भीषण होता की, या अपघातात रिक्षा चालकाचा जागीच मृत्यू झाला. जावेद शेख असे या चालकाचे नाव आहे. ते आपल्या



रिक्षामध्ये भाजीपाला घेऊन कारंजाकडे जात होते. याचदरम्यान अमरावती महामार्गावर ट्रकने त्यांच्या रिक्षाला धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, अपघातात रिक्षाचा चुरडा झाला. अपघाताची बातमी मिळताच स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान हा अपघात नेमका कशामुळे झाला याचे कारण समोर येऊ शकलेले नाही. अपघातानंतर घटनास्थळी भाज्यांचा सडा पडला होता.

कारंजाकडे जात असताना अपघात

घटनेबाबत अधिक माहिती अशी की, जावेद शेख हे एक रिक्षा व्यवसायिक आहे. ते आपल्या रिक्षामधून भाजीपाला घेऊन कारंजाकडे निघाले होते.

## लाखोंच्या बायोडिझेलची अवैध वाहतूक, पोलिसांनी सापळा रचून अशी केली कारवाई

जालना : जालना जिल्हा पुरवठा विभागाच्या पथकाने पनवेलकडून रायपुर छत्तीसगडकडे जाणारे पंधरा लाखांचे अवैध बायोडिझेल काल (25 फेब्रुवारी) रात्री जालन्यात पकडण्यात आलं आहे. सदर टँकर जप्त करुन तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हा पुरवठा विभागाच्या पथकाने 15 लाखांचे डिझेल व 15 लाखाचे टँकर असा जवळपास 30 लाखाचा मुद्देमाल पुरवठा विभागाने जप्त केला असून तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुरवठा विभागाचे पुरवठा निरीक्षक प्रकाश जाधव यांना हे अवैध बायोडिझेलचे टँकर येत असल्याची माहिती मिळाली





होती. त्यानुसार त्यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी रीना बसय्ये यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पुरवठा निरीक्षक गजानन शिवलाल मोरे आणि काही साक्षीदार घेऊन काल (25 फेब्रुवारी) रात्री 10 वाजता जालना- देऊळगावराजा रोडवरील पानशेंद्रा शिवारामध्ये खाजगी वाहनाने जाऊन सापळा रचला. सव्वा दहा वाजताच्या सुमारास जालना शहराकडून MH 04- JU 0422 हा टँकर येत असल्याचे दिसले. या टँकरला थांबवून कागदपत्रं तसेच टँकरमधील मालाविषयी विचारणा केली असता, टँकरचा चालक मच्छिंद्र भाऊसाहेब मस्के रा. सावरगाव, ता. आष्टी, जि. बीड यांनी दिलेल्या माहितीनुसार त्याच्या "मालकाने न्यू आजीवली व्हीलेज, ता.पनवेल जि. रायगड येथून हे टँकर भरून दिले आहे आणि ते रायपूर छत्तीसगडकडे घेऊन जाण्यास सांगितले होते." गाडी समवेत कुठलीच कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने टँकर मधील बायोडिझेल नमुना तपासणीसाठी काढून घेऊन बायोडिझेलने भरलेला टँकर तालुका पोलीस ठाण्यात जमा करण्यात आला. टँकर चालक आणि त्याच्यासोबत असलेल्या संजय शामराव गंगे रा. गंगेवाडी ता. आष्टी जि. बीड या दोघांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

15 लाख रुपयांचे वाहन व 15 लाख रुपयांचे अवैध बायोडिझेल असा सुमारे 30 लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला असून जीवनावश्यक वस्तू कायद्यान्वये (E.C.ॲक्ट) पुरवठा निरीक्षक प्रकाश जाधव यांच्या तक्रारीवरून तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## 'देव तारी, त्याला कोण मारी'

### खेळणारा दोन वर्षांचा चिमुरडा गाडीखाली आला कारचालकाची अक्षम्य हलगर्जी

विरार : 'देव तारी, त्याला कोण मारी' या म्हणीचा प्रत्यय देणारी घटना मुंबईजवळच्या विरारमध्ये (Virar) पाहायला मिळाली आहे. दोन वर्षांच्या मुलाच्या अंगावरुन कार (Car) गेली, मात्र सुदैवाने चिमुरड्याला कुठलीही दुखापत झाली नाही. गाडी गेल्यानंतर दुसऱ्या बाजूने हा लहान मुलगा चालत बाहेर आला. विरार पश्चिमेच्या ग्लोबल सिटी येथील गार्डनर एव्हेन्यू या सोसायटीमध्ये हा प्रकार घडला. कारखालून बाहेर पडणारा मुलगा सीसीटीव्ही कॅमेऱ्यात (CCTV Camera) कैद झाला आहे. 23 फेब्रुवारी रोजीची ही घटना आहे. चिमुरडा या घटनेतून बालंबाल बचावला असला तरी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे गुन्हा दाखल करण्यात आला



आहे. बेजबाबदार कार चालक मनोज यादव आणि कारमध्ये बसलेल्या नैना सावंत यांच्या विरोधात बर्डे कुटुंबीयांनी भारतीय दंड कलम 279, 337 आणि मोटरवाहन अधिनियम 187 अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

**काय आहे प्रकरण?**

विरार पश्चिमेच्या ग्लोबल सिटी येथील गार्डनर एव्हेन्यू या सोसायटीमध्ये दोन वर्षांच्या मुलाच्या अंगावर कार जाऊन सुद्धा मुलगा कारच्या खालून सुखरुप बाहेर पडला.

गार्डन आव्हेन्यू या सोसायटीतील उमा बर्डे यांच्या घरी त्यांचा मुलगा तेजस, सून रसिका आणि दोन वर्षांचा नातू तस्मय राहायला आले होते. 23 फेब्रुवारी रोजी सायंकाळी सव्वा सहाच्या दरम्यान आजी उमा बर्डे आपला दोन वर्षाचा नातू तस्मय याला बिल्डिंगच्या आवारात फिरण्यासाठी घेऊन आल्या होत्या.

नेमकं काय घडलं?

तस्मय खेळत असताना बिल्डिंगमध्ये आलेल्या अर्टिगा कारने हॉर्न न वाजवता तस्मयला जोराची धडक दिल्याचा आरोप केला जात आहे. चिमुरडा तस्मय कारच्या चाकाखाली येऊन गाडीच्या मधोमध आला. मात्र गाडीच्या मागून लगेच बाहेर पडला. यात तस्मय किरकोळ जखमी झाला आहे.

चालक-मालकावर गुन्हा

सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे बेजबाबदार कार चालक मनोज यादव आणि कारमध्ये बसलेल्या नैना सावंत यांच्या विरोधात बर्डे कुटुंबीयांनी तक्रार दाखल केली. त्यानुसार भारतीय दंड कलम 279, 337 आणि मोटरवाहन अधिनियम 187 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# पोलीस बातमी पत्र

मुंबई

२

मुंबई, मंगळवार ०१ ते ०७ मार्च - २०२२


## विरार हादरले! भरदिवसा रस्त्यात एकाची गोळ्या घालून हत्या



विरार : विरार पूर्वेत भरदिवसा एका तरुणावर गोळीबार झाल्याची घटना घडली आहे. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. आरोपीने तरुणावर चार गोळ्या झाडल्याची माहिती समोर आली आहे. परंतु नेमकं कोणत्या कारणामुळे तरुणावर हल्ला झाला हे अस्पष्ट असून पोलिसांकडून तपास सुरू आहे. समय चौहान असं मृत तरुणाचं नाव आहे.

सविस्तर वृत्त असे की, मनवेल पाडा रोड येथील नालासोपारा विरार ९० फुटी रस्त्यावर समय चौहान नावाच्या तरुणावर दोन अज्ञात दुचाकीस्वारांनी गोळीबार केला आहे. यात समय चौहान गंभीर जखमी झाला होता. त्याला रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते, मात्र त्याचा मृत्यू झाला आहे. समय चौहान हा व्यापारी असून फर्निचर आणि बाजार भरविण्याचे काम करत होता, अशी माहिती मिळत आहे.

आरोपींनी समयवर चार गोळ्या झाडल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरु असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## पळून जाऊन लग्न केल्याने तरुणाचे अपहरण, टेभुर्णी पोलिसांकडून तरुणांची सुटका, 8 जण ताब्यात

सोलापूर : मुलीने पळून जाऊन लग्न केले म्हणून मुलीच्या घरच्यांनी मुलाचे अपहरण (Kidnapping) केल्याची घटना उघडकीस आली आहे. टेभुर्णी पोलिस आणि महामार्ग पोलिसांनी अपहृत तरुणाची सुटका (Rescue) केली आहे. याप्रकरणी पोलिसांनी 8 जणांना अटक करुन त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. अटक केलेल्या आरोपींमध्ये एका महिलेचाही समावेश आहे. तरुणाची सुटका करुन त्याला हैदराबाद पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. मुलीच्या घरच्यांनी पीडित तरुणाचे हैदराबाद येथून अपहरण केले होते.

अपहरण करणाऱ्या आरोपींमध्ये एका महिलेचाही समावेश

राजस्थान येथील तरुणाने पळून जाऊन लग्न केल्याने मुलीच्या नातेवाईकांनी हैद्राबाद येथून एका तरुणाचे अपहरण केले होते. त्याला पुणे येथून घेऊन निघाले होते. टेभुर्णी पोलिस व महामार्ग पोलिसांच्या मदतीने अपहरणकर्त्यांना ताब्यात घेऊन त्या तरुणाची सुटका करण्यात आली. त्यास हैद्राबाद पोलिसांकडे स्वाधिन केले आहे. 26 फेब्रुवारी रोजी सोलापूर पुणे महामार्गावरील माढा तालुक्यातील वरवडे



टोलनाक्यावर ही घटना उघडकीस आली. अपहरण केलेल्या 8 जणांवर टेभुर्णी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून यामध्ये एका महिलेसह सात जणांचा समावेश असून या 8 जणांना 26 च्या रात्री उशिरा हैद्राबाद पोलिसांनी टेभुर्णीत येऊन आरोपींना ताब्यात घेतले आहे.

पीडित तरुणाने आरोपींच्या नात्यातील मुलीशी पळून विवाह केला होता

राजस्थान येथील रामनिवास याने संशयित आरोपीच्या नात्यातील एका मुलीशी पळून जाऊन प्रेमविवाह केला होता. त्यानंतर ते दोघेही हैद्राबाद येथे वास्तव्यास होते. त्यामुळे मुलीच्या नातेवाईकांनी हैद्राबाद येथे जाऊन मुलीशी लग्न केलेल्या त्या तरुणाचे हैद्राबादमधून अपहरण केले होते. याप्रकरणी तेलंगणा राज्यातील वनस्थळी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होता. हैद्राबादवरुन पुण्याकडे जात असताना वरवडे टोलनाक्यावर नाकाबंदी करुन टेभुर्णी पोलिस व महामार्ग पोलिसांनी आरोपींना अटक करुन त्या प्रेम विवाह केलेल्या तरुणाची सुटका केलीय.

## कल्याणमध्ये ज्वेलर्सकडून 1 कोटी 56 लाखांचा गोल्ड स्कीम फ्रॉड
## १८ टक्के परताव्याचं आमिष दाखवून फसवणूक

कल्याणमध्ये एका ज्वेलर्सने गुंतवणूकदारांना एक कोटी ५६ लाखांचा गंडा घातल्याची धक्कादायक माहिती समोर आलीय. शहरामधील मे. एस कुमार गोल्ड अ‍ॅण्ड डायमंड या ज्वेलर्सने तब्बल २६ जणांची अधिक व्याजदर देतो सांगून फसवणूक केलीय. या प्रकरणामध्ये सध्या ज्वेलर्सच्या दुकानाचं शटर बंद झालं असून येथील व्यवस्थापकीय संचालक फरार झालाय. या प्रकरणात गुन्हा नोंदवण्यात आलाय.



**नक्की घडलं काय?**

कल्याण पश्चिमेकडील वल्लीपीर मार्गावरील झोझवाला हाऊसमधील मे. एस कुमार गोल्ड अ‍ॅण्ड डायमंडचे शटर अचानक बंद झाल्याने त्यामध्ये गुंतवणूक करणाऱ्यांचे पुरते धाबे दणाणले आहेत. आतापर्यंत या शोरूमच्या मालक, चालक आणि संचालकांनी २६ गुंतवणूकदारांना तब्बल १ कोटी ५६ लाख ७४ हजार ५३९ रूपयांचा चुना लावल्याच्या तक्रारी महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आल्या आहेत. या संदर्भात कल्याण मलंगगड रोडला अमृता पार्क सोसायटीत राहणाऱ्या रोशल गावित (३३) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी भादंवि कलम ४२०, ४०६ सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या वित्तीय संस्थांमधील हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम कायद्यातील कलम तीन अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

**१५ ते १८ टक्के रिटर्नसच्या नावाने फसवणूक**

१५ ते १८ टक्के व्याजदराने पैसे रिटर्न मिळण्याचे आमिष दाखवून ही फसवणूक करण्यात आल्याची माहिती समोर आलीय. या ज्वेलर्स दुकानाचा व्यवस्थापकीय संचालक श्रीकुमार पिल्लई याने मुदत ठेवीवर आकर्षक परतावा देण्याचे आमिष लोकांना दाखवले. तसेच गोल्ड स्किमच्या गुंतवणूकीमध्ये माफक दरात सोने व डायमंड देत असल्याचे व त्याकरीता त्यांच्याकडे मासिक भिशी योजना, फिक्स डिपॉजीट योजना अशा आकर्षक योजना चालू असल्याचे भासवून लोकांकडून पैसे घेतले. या पैशांवर १५ ते १८ टक्के व्याजदराने रिटर्न मिळतील अशी जाहीरातबाजी त्याने केली.

**सोनेही नाही आणि पैसेही नाही**

सन २०१८ ते सन २०२१ पर्यंतच्या कालावधीत मे. एस. कुमार गोल्ड अ‍ॅण्ड डायमंड ज्वेलर्सच्या श्रीकुमार पिल्लईने रोशल गावित यांच्याकडून २ लाख ४० हजार रुपये, त्यांची आई क्लाडेट परेरा यांच्याकडून १० हजार रुपये गुंतवणूक म्हणून घेतले. मात्र या पैशांच्या मोबदल्यात सोने दिले नाही. तसेच त्यांचे घेतलेले पैसे परत न करता त्यांचा विश्वासघात करुन फसवणूक केली. त्याचप्रमाणे श्रीकुमारने अन्य ग्राहकांकडून पैसे स्वीकारुन त्यांना देखील सोने, डायमंड न देता किंवा घेतलेली रक्कम परताव्यासह परत न करता दुकान बंद करून पळ काढला आहे.

**कागदोपत्री पुराव्यांसह पोलिसांकडे अर्ज**

यातील फिर्यादी रोशल गावित आणि त्यांची आई क्लॉडेट यांनी तक्रार दाखल केलीय. तसेच इतर २५ तक्रारदारांची मिळून एकूण १ कोटी ५६ लाख ७४ हजार ५३९ रुपये इतक्या रक्कमेचा अपहार करून फसवणूक केल्याच्या तक्रारी दाखल केल्या आहेत. मे. एस कुमार गोल्ड अ‍ॅण्ड डायमंड ज्वेलर्सचा व्यवस्थापकीय संचालक श्रीकुमारविरोधात या तक्रारी करण्यात आल्यात. सर्व तक्रारदारांनी कागदोपत्री पुराव्यांसह पोलिसांकडे अर्ज दाखल केला आहे.

## तलवारी घेऊन चौकात डान्स पाहून पोलीस आले बुलढाण्यातील धक्कादायक घटना

हातात तलवारी घेऊन नाचणाऱ्या तरुणांचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होताच बुलढाणा शहर पोलिसांनी दहा जणांवर गुन्हा दाखल करीत तीन आरोपींना अटक केली आहे.



लेमन उर्फ संजय काळे, अमित बेडवाल, पवनसाठे असे अटक केलेले आरोपींचे नावे आहे. २० फेब्रुवारी रोजी रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास शहरातील क्रांती चौकात लाऊड स्पीकरवर गाणे लावून तलवारी घेऊन हे तरुण नाचत होते. याबाबतचा व्हिडीओ सोशल मीडियावर लाइव्ह वेबकास्टच्या माध्यमातून व्हायरल झाल्यानंतर व्हिडिओ मधील युवकांचे पडताळणी करून बुलढाणा शहर पोलिसांनी कारवाई केली.

बुलढाणा पोलीस स्थानकामधील उपनिरीक्षक दिलीप पवार, एएसआय माधव पेटकर, पोलीस हेड कॉनस्टेबल सुनिल जाधव, पो कॉन्सटेबल उमेश घुबे, चालक पोलीस हेड कॉनस्टेबल रमेश वाघ यांनी क्रांती चौकात धाव घेतली. पोलिसांना पाहून नाचणाऱ्यांनी पळापळ सुरु केली. यात लखन साठे, पवन साठे, सुनील काळे यांच्या हातात तलवारी दिसून आल्या.

या प्रकरणी एएसआय माधव पेटकर यांच्या तक्रारीवरुन लखन साठे, पवन साठे, सुनील उर्फ लेखन काळे, अमित बेंडवाल, निशांत श्रीवास्तव व इतर ८ ते १० जणांचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संजय काळे, अमित बेडवाल, पवन साठे या तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. घटनेचा पुढील तपास साहाय्यक पोलिस निरीक्षक नीलेश लोधी हे करीत आहेत.

## कुऱ्हाड-कोयत्याचा धाक दाखवत अंत्यसंस्कार रोखला

**नातेवाईकांना जबर मारहाणीचा धक्कादायक प्रकार**



डोंबिवलीत अंत्यविधीसाठी स्मशानभूमीत पार्थिव घेऊन गेलेल्या नातेवाईकाला कुऱ्हाड-कोयत्याचा धाक दाखवून मारहाण केल्याची आणि अंत्यविधी रोखल्याची धक्कादायक घटना घडली. ही घटना डोंबिवली जवळील घारीवली गावात घडली. याप्रकरणी पाच आरोपींविरुध्द मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुरुनाथ पाटील, बाळकृष्ण पाटील, सुनील पाटील, सुभाष पाटील, कुसुम पाटील (सर्व रा. घारीवली) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. या घटनेमुळे ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.

घारीवली गावात तक्रारदार सचिन पाटील (४२) हे कुटूंबासह राहतात. त्यांचे चुलते केशव पाटील यांचे निधन झाले होते. त्यामुळे नातेवाईकांनी त्याच दिवशी सायंकाळी साडेचार वाजता त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यासाठी घारीवली गावातील पाण्याच्या टाकी शेजारी असलेल्या स्माशनभूमीत नेले. याठिकाणी पाचही आरोपींनी आमची जागा आहे असे म्हणत स्माशनभूमीत पार्थिव दहनाला मनाई केली आणि सचिन पाटील यांच्याशी वाद घातला.

यानंतरही मृतदेहावर अंत्यविधी करत असताना पाहून आरोपींनी कुऱ्हाड आणि लोखंडी कोयते हातात घेऊन सचिन पाटील व त्याचा भाऊ दोघांवरही धावून गेले. यावेळी अंत्यविधीसाठी आलेल्या इतर नागरिकांनी हे पाहून स्माशनभूमीतून पळ काढला. त्यानंतर सचिन व त्यांच्या भावाला पाचही आरोपींनी शिवीगाळ करत मारहाण केली.

## महिलेसोबत अश्लील संभाषण प्रकरणी अटक, फीट आल्याने न्यायालयीन कोठडीतील आरोपीचा मृत्यू

डोंबिवली : ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली शहरात (Dombivli) मानपाडा पोलीस ठाण्यात एका आरोपीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. आरोपीला फिट आल्यानंतर त्याचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. दत्तात्रेय वारके असं या आरोपीच नावं आहे. एका महिलेसोबत अश्लील संभाषण केल्या प्रकरणी (Molestation) दत्तात्रेय वारके याला अटक करण्यात आली होती. तो न्यायालयीन कोठडीत (Judicial Custody) मानपाडा पोलीस ठाण्याच्या आयसोलेशन रुममध्ये होता. मात्र सोमवारी पहाटे त्याला फीट आल्याने तो बेशुद्ध पडला. पोलिसांनी त्याला रुग्णालयात दाखल केले असता उपचारा दरम्यान दत्तात्रेय याचा दुर्दैवी मृत्यू झाला.

**काय आहे प्रकरण?**

दत्तात्रेय वारके या व्यक्तीविरोधात डोंबिवलीतील मानपाडा पोलिस ठाण्यात 5 फेब्रुवारी रोजी या प्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. एका महिलेसोबत फोनवर अश्लील संभाषण केल्याचा त्याच्यावर आरोप होता. दत्तात्रेय हा एका बिल्डरकडे कामाला होता. 2013 साली त्यांनी घर विकत देण्यासाठी एका महिलेकडून पाच लाख रुपये घेतले, मात्र या महिलेला तो घर पण देत नव्हता आणि पैसे पण परत करत नव्हता. यासंदर्भात महिलेने वारंवार दत्तात्रयकडे तगादा लावला, मात्र दत्तात्रेय काही



ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. एके दिवशी फोनवर त्याने महिलेसोबत अश्लील वर्तन केल्याचा दावा केला जातो.

**आरोपीला जळगावातून अटक**

याबाबत संबंधित महिलेने मानपाडा पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. या संदर्भात महिलेने मानव अधिकारासह इतर ठिकाणी सुद्धा तक्रारी दिल्या होत्या. मानपाडा पोलिस ठाण्यात दत्तात्रय विरोधात महिलेकडून करण्यात आलेल्या तक्रारीवर पोलिसांनी 26 फेब्रुवारीला जळगावहून त्याला अटक केली. कल्याण कोर्टात हजर केले असता कोर्टाने त्याला न्यायालयीन कोठडीत पाठवले.

**फीट आल्याने बेशुद्ध**

आरोपीला न्यायालयीन कोठडीत पाठवण्याचा आधी कोव्हिड रिपोर्ट बंधनकारक आहे. त्यासाठी मानपाडा पोलिसांनी दत्तात्रेय आला पोलीस स्टेशनच्या आयसोलेशन रूममध्ये ठेवले होते. त्याची कोव्हिड चाचणी केली होती. पोलिस रिपोर्टच्या प्रतीक्षेत होते, मात्र आज पहाटे त्याला फीट आल्याने तो बेशुद्ध पडला. पोलिसांनी त्याला रुग्णालयात दाखल केले असता उपचारा दरम्यान दत्तात्रेयाचा दुर्दैवी मृत्यू झाला.दत्तात्रेय याचे कुटुंब भुसावळला राहते. दुर्दैवी बाब म्हणजे कालच त्याच्या भावाचाही अपघात झाला आहे. फीट आल्याने दत्तात्रेयचा मृत्यू झाल्याची माहिती मानपाडा पोलिसांनी दिली आहे. पुढील तपास सुरू आहे. त्याचा मृतदेह जेजे रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवला असून डॉक्टरांच्या पॅनल खाली त्याचे शवविच्छेदन होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## जन्मदात्या आईवर बलात्कार करणाऱ्या मुलाला जन्मठेप

आपल्या जन्मदात्या आईवर बलात्कार करणाऱ्या मुलाला नागपूर सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणामधील आरोपी ३२ वर्षाचा असून तो व्यवसायाने मजूर आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार आरोपीचं लग्न झालेलं होतं. परंतु, त्याच्या विकृत स्वभावामुळे पत्नीला त्याच्यासोबत राहणे कठीण झाले. परिणामी



तिने घटस्फोट घेतला होता. घरामध्ये हा आरोपी आपल्या आईसोबत राहत होता. या आरोपीने आपल्या आईवर बलात्कार करण्याच्या तीन वर्षापूर्वीच त्याची पत्नी त्याला सोडून गेली होती. पीडित आई धुणीभांडी करून आपला उदर्निवाह करत होती. ती आरोपीचीही काळजी घेत होती. असे असताना २१ जून २०२१ रोजी मध्यरात्री आरोपीने आपल्या आईवरच बलात्कार केला.

त्यानंतर पोलिसांनी आईच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला व त्याला अटक केली. पोलीस उपनिरीक्षक अमित बकतवार यांनी प्रकरणाचा तपास केला. न्यायालयात सरकार पक्षाने आई व इतर साक्षीदारांचे जबाब आणि डीएनए अहवाल यावरून आरोपीवरील गुन्हा सिद्ध केला. सरकारच्या वतीने अ‍ॅड. रश्मी खापर्डे यांनी कामकाज पाहिले.

## यशवंत जाधव यांच्या निवासस्थानी प्राप्तिकर छापा




मुंबई : शिवसेनेचे उपनेते आणि मुंबई महानगरपालिकेतील स्थायी समितीचे अध्यक्ष यशवंत जाधव यांच्या माजगाव येथील निवासस्थानी शुक्रवारी सकाळी प्राप्तिकर विभागाने छापा टाकला. प्राप्तिकर विभागाचे अधिकारी जाधव यांच्या निवासस्थानी संध्याकाळी उशिरापर्यंत चौकशी करीत होते. या प्रकरणी मुंबईत ३३ ठिकाणी शोध मोहीम राबविण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. केंद्रीय तपास यंत्रणेकडून महाविकास आघाडीतील मंत्र्याच्या चौकशीचे सत्र सुरू असल्याचा आरोप शिवसेनेकडून होत असताना शुक्रवारी जाधव यांच्या निवासस्थानी प्राप्तिकर विभागाने धाट टाकल्याने राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू झाली.

शिवसेनेचे माझगावमधील नगरसेवक व स्थायी समितीचे अध्यक्ष यशवंत जाधव यांच्या निवासस्थानी शुक्रवारी सकाळी प्राप्तिकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी छापा टाकला. सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) नवाब मलिक यांना अटक केल्यानंतर महाविकास आघाडी आक्रमक झाली असतानाच यशवंत जाधव यांच्या निवासस्थानी प्राप्तिकर विभागाने छापा टाकला. पालिकेची निवडणूक लवकरच अपेक्षित असून पालिकेतील शिवसेनेचा सर्वात मोठा नेताच चौकशीच्या फेऱ्यात अडकल्यामुळे शिवसैनिकांमध्ये काळजीचे वातावरण पसरले आहे. यशवंत जाधव यांच्या पत्नी यामिनी जाधव या दक्षिण मुंबईतील आमदार असून जाधव पती-पत्नी शिवसेना पक्षप्रमुखांच्या जवळचे मानले जातात. विधानसभा निवडणुकीच्या वेळी आमदार यामिनी जाधव यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात उत्पन्नाबाबत चुकीची माहिती दिल्याच्या आरोपावरून ही चौकशी सुरू झाल्याचे समजते. तपास सुरू असल्याने जाधव यांचे निवासस्थान असलेल्या इमारतीबाहेर मोठ्या प्रमाणात सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. सीआरपीएफचे जवान तैनात करण्यात आले आहेत.

या प्रकरणाशी संबंधित ३३ ठिकाणी प्राप्तिकर विभागाने छापे टाकले. यापैकी पाच ठिकाणे कंत्राटदारांशी संबधित असल्याचे सूत्रांनी सांगितले.

जाधव हे स्थायी समितीचे अध्यक्ष असल्याने स्थायी समितीमध्ये मंजूर होणाऱ्या सर्व आर्थिक निर्णयांमध्ये त्यांचा मोठा सहभाग आहे. त्यातच गेले वर्षभर पालिकेतील भाजपच्या लोकप्रतिनिधीनी स्थायी समितीमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होत असल्याचे आरोप वारंवार केले होते.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई



मुंबई, मंगळवार ०१ ते ०७ मार्च - २०२२

## संपादकीय...



# तेलाचे त्रांगडे !

युक्रेन-रशिया संघर्षांमुळे खनिज तेलाच्या दरात झालेली मोठी वाढ हे अर्थव्यवस्थेसमोरील गंभीर आव्हान असल्याचे निर्मला सीतारामन यांनी मान्य केले ते बरे झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वास या दर निश्चितीत काही भूमिका नसल्यामुळे अर्थमंत्री सीतारामन यांस ही कबुली द्यावी लागली असावी. कारण काहीही का असेना, पण खनिज तेलाच्या दरवाढीचे गांभीर्य आणि त्या बाबतची जाहीर वाच्यता अर्थमंत्र्यांकडूनच झाली हे योग्य झाले. कारण अलीकडे वीजधारित वाहने, पर्यायी ऊर्जास्रोत आदींबाबत जो काही सरकारी हुच्चपणा सुरू आहे तो पाहून खनिज तेलाचे जणू दिवस भरले की काय, असे कोणासही वाटावे. वास्तविक या साऱ्याचे कितीही कोडकौतुक केले तरी आगामी किमान पाच दशके खनिज तेलास निदान भारतातून तरी मरण नाही. किंबहुना हे सर्व



पर्यायी ऊर्जास्रोत आदींचे डिंडीम पिटले जात असले आणि हायड्रोकार्बन उत्सर्जनाच्या आणाभाका घेतल्या जात असल्या तरी प्रत्यक्षात आपलीही खनिज तेलाची मागणी वाढती आहे, हे लक्षात घ्यायला हवे. म्हणजे आपल्या गरजेच्या ८२ ते ८५ टक्के इतके तेल आपण आयात करतो. याचा अर्थ देशांतर्गत गरज भागवू शकेल इतके खनिज तेल आपल्याकडे नाही. ते का नाही, यास उत्तर नाही. एखाद्याच्या अंगणातील विहिरीस नाही पाणी लागत, तसे हे. वास्तव हे असे असल्यामुळे आपल्या ऊर्जा गरजांवर आंतरराष्ट्रीय घडामोडींचा मोठा परिणाम होत असतो. अर्थमंत्र्यांनी त्याचीच मान्यता दिली.त्याचवेळी आंतरराष्ट्रीय बाजारात खनिज तेलाचे दर नोंदणीसाठी ९९ डॉलर्स प्रतिबॅरलवर गेले होते आणि प्रत्यक्ष लगेच उचलल्या जाणाऱ्या तेलाचा भाव १०० डॉलर्सचा टप्पा ओलांडून पुढे गेला होता. गेल्या काही महिन्यांत आंतरराष्ट्रीय बाजारात झालेली ही तेल दरवाढ तब्बल ४० टक्क्यांहून अधिक आहे. पण प्रत्यक्षात किरकोळ विक्रीच्या तेल दरात सरकारी तेल कंपन्यांनी वाढ केलेली नाही. यामागील कारण अर्थातच पाच राज्यांत सुरू असलेल्या निवडणुका. हे कारण तेल दर निश्चितीत निर्णायक ठरते. भले तेल दरावरील सरकारी नियंत्रण सोडल्याचा दावा आपले सरकार कितीही उच्चरवात करो. वास्तव पूर्वी होते तसेच आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे दर कमी झाल्यावर सरकारने आपले पेट्रोल-डिझेल स्वस्त केले नाही आणि आता निवडणुकांचे मतदान पूर्ण होईपर्यंत ते महाग केले जाणार नाही. मार्च ७ हा पाच राज्यांतील मतदानाचा शेवटचा दिवस. तोपर्यंत आंतरराष्ट्रीय राजकारणाची परिस्थिती निवळली नाही तर सरकारला त्याच दिवशी तेल दरवाढ करावी लागेल, हे नि:संशय. कारण हा संघर्षच मुळी तेलावरून आणि तेलासाठी आहे. त्यावरून सुरू झालेल्या विद्यमान संघर्षात तीन प्रमुख खेळाडू आहेत. अमेरिका, रशिया आणि सौदी अरेबिया. जगाची अडचण अशी की या तीन खेळाडूंचे हितसंबंध काही मुद्द्यांवर समान आहेत आणि काही मुद्द्यांवर अगदीच परस्परविरोधी. त्यामुळे गेली दोन वर्षे या तीन खेळाडूंच्या साठमारीत खनिज तेल अडकलेले असून त्याचा फटका भारतासारख्या अनेक देशांस बसत आहे. म्हणून हा संघर्ष समजून घेणे महत्त्वाचे.

उदाहरणार्थ अमेरिका, रशिया आणि सौदी अरेबिया या तीनही देशांस खनिज तेलाचे दर चढे राहण्यात एकाचवेळी स्वारस्य आहेही आणि नाहीही. म्हणजे असे की हे दर जेव्हा चढे असतात तेव्हा सौदी आणि रशिया यांच्या तिजोरीतला छनछनाट वाढतो. पण त्यामुळे अमेरिकेतील अनेक तेल कंपन्यांसही फायदा होतो. या कंपन्यांनी फ्रॅकिंग या नव्या तंत्रज्ञानाद्वारे तेल उत्खनन सुरू केले त्यास गेल्या चार वर्षांत मोठी गती आली. पण या मार्गाने तेल उत्खनन अत्यंत खर्चीक. ते सुरू ठेवायचे तर तेलाचे दर चढेच हवेत. ते ६०-६५ प्रति बॅरलपेक्षा कमी होतात तेव्हा या कंपन्यांस फटका बसतो. यातून त्यांचा उत्पादन खर्चही निघत नाही. आठ वर्षांपूर्वी म्हणजे २०१४ साली आणि करोना कहरानंतर २०२० साली जेव्हा तेलाच्या दरांत अभूतपूर्व घसरण झाली तेव्हा या कंपन्यांचे दिवाळे वाजले. डाकोटासारख्या प्रांतात तर एकाच दिवशी तीनेकशे अशा कंपन्यांनी आपली चूल विझवून टाकली. इतक्या स्वस्तात तेल विकणे त्यांस परवडेनासे झाले. या अमेरिकी कंपन्यांचे बंबाळे वाजल्यानंतर यथावकाश तेल दरांत वाढ सुरू झाली. दुसरीकडे तेल दर अतिकमी व्हावेत यात रशियास आणखी एका कारणासाठी रस. ते म्हणजे यातून होणारी सौदी अरेबियाची अडचण. तेलाचे दर ६० डॉलर्स प्रतिबॅरलपेक्षाही कमी झाल्यास ते सौदी अरेबियास ‘महाग’ पडते. याचे कारण या देशाकडे तेलाखेरीज उत्पन्नाचे अन्य साधन नाही. अमेरिका आणि रशिया यांची मात्र परिस्थिती अशी नाही. तेलाखेरीज या देशांकडे विकण्यासारखे बरेच काही आहे. तेव्हा स्वस्त तेलाने सौदीची अशी अडचण होत असेल तर एका बाजूने ते अमेरिकेसाठीही स्वागतार्ह असते.

# 'तटस्थ' पणाचा पेच

## गेल्या साठ-सत्तर वर्षांत जग खूप बदलले आहे आणि भौगोलिक अंतराला आता फारसा अर्थ राहिलेला नाही. जगाच्या एका कोपऱ्यात आढळलेला विषाणू किती झपाट्याने जग पादाक्रांत करतो

गेल्या साठ-सत्तर वर्षांत जग खूप बदलले आहे आणि भौगोलिक अंतराला आता फारसा अर्थ राहिलेला नाही. जगाच्या एका कोपऱ्यात आढळलेला विषाणू किती झपाट्याने जग पादाक्रांत करतो, याचा भयंकर अनुभव आपण नुकताच घेतला आहे. सर्वच देशांचे एकमेकांशी व्यवहार वाढल्यावर, आर्थिक हितसंबंध निर्माण झाल्यावर आता 'अलिप्ततावादी' या शब्दालाही फारसा अर्थ उरलेला नाही. युक्रेनवर रशियाने युद्ध लादल्यानंतर, जगात प्रत्येक देशाला आपण कोणाच्या बाजूने आहोत हे स्पष्ट करण्याची गरज त्यामुळेच भासत आहे. विशेषतः, युक्रेनमध्ये पंधरा हजारांहून अधिक भारतीय अडकून पडलेले असताना, क्रूड तेलाचे भाव वाढत असताना आणि देशात शेअर बाजारात हल्लकल्लोळ सुरू असताना, या पेचप्रसंगाबाबत 'तटस्थ भूमिका' हा शब्द वापरताना भारताची त्यामुळेच एक प्रकारे तारांबळ उडत आहे. 'धीराने घ्या', 'घाबरून जाऊ नका' हे शब्द किती तोकडे आणि पोकळ आहेत, याचा अनुभव हजारो भारतीय विद्यार्थी सध्या युक्रेनमध्ये घेत आहेत. अनेकांनी ट्वीटरवरून याविषयी नाराजीही व्यक्त केली आहे. रशिया कोणत्याही क्षणी हल्ला करू शकेल, अशी स्थिती जवळपास गेला महिनाभर आहे. हल्ला झाल्यानंतर लगेचच किंवा हल्ला दृष्टिपथात येताच जलद हालचाली करून भारतीयांना मायदेशी आणण्यासंबंधीची योजना तयार ठेवणे काही अवघड नव्हते. आजच्या काळात तर ते अजिबातच अशक्य नव्हते; परंतु तसे झाले नाही आणि गेल्या महिनाभरात केवळ चार हजार भारतीय स्वतःहून मायदेशी परतले. युद्धाला तोंड फुटल्यावर, उरलेल्यांपैकी काहींना घेऊन एक भारतीय विमान परतले आणि नंतर रशियाने हवाई हद्दीचीच नाकेबंदी केल्याने एअर इंडियाच्या विमानाला अर्ध्या वाटेवरून माघारी यावे लागले. अमेरिका आणि रशिया या दोन्ही देशांशी लष्करी संबंध असल्यामुळे, 'कोणालाच दुखवायचे नाही' याचा दबाव येऊन, भारताला तटस्थ भूमिका घ्यावी लागत आहे. याचे परिणाम भविष्यात नक्कीच जाणवणार आहेत.

भारतीय वकिलातीचे अधिकारी तेथील भारतीयांना 'घरातच राहा', 'बाहेर पडावेच लागले, तर गुगल मॅपवर बॉम्ब शेल्टर शोधा आणि तिथे जा' अशी आवाहने केवळ करीत आहेत.

तेथे असलेले विद्यार्थी आणि भारतातील त्यांचे नातेवाइक मात्र युद्धाची व्याप्ती वाढणार नाही, अशी अपेक्षा करीत भीतीच्या सावटाखाली वावरत आहेत.

या युद्धाचा परिणाम म्हणून, जागतिक बाजारात क्रूड तेलाच्या भावात एकाच दिवसात प्रती बॅरल आठ ते दहा डॉलरने वाढ झाल्याचा फटका भारतीयांना बसणार, हे उघडच आहे. शंभरी पार करण्याचे 'कौतुक' ओसरून,



पेट्रोलने अनेक ठिकाणी आधीच एकशे दहा रुपये प्रति लिटरचा टप्पाही गाठला आहे. त्याची वाटचाल आता १२५ रुपयांच्या दिशेने होते की काय, अशी धडकी सामान्यांच्या मनात भरली आहे. २०१४ ते २०२० या काळात क्रूड तेलाचे भाव प्रती बॅरल पन्नास-पंचावन्न डॉलरपर्यंत खाली आले होते, तेव्हा पेट्रोलच्या दराबाबतही भारत सरकार 'तटस्थ' राहिले आणि भावातील उताराचा फायदा जनेला मिळू दिला नाही. आता हे भाव चढे असताना मात्र पेट्रोलपंपावरील प्रति लिटरच्या किमतीचे आकडे किती वेगात पुढे फिरतील, याची भीती सामान्यांना वाटते आहे. मध्यमवर्गीय भारतीयांना आर्थिक बचतीसाठी शेअर बाजार आणि म्युच्युअल फंडाकडे वळवण्यासाठी अनेक वर्षे जावी लागली. बचत खात्यावरील व्याज कमी झाल्यावर आणि मुदतठेवही अनाकर्षक वाटू लागल्यावर गेल्या काही वर्षात हा ओघ शेअरकडे वळू लागला आहे. रशियाने युक्रेनवर हल्ला केल्यानंतर अवघ्या काही तासांतच सेन्सेक्स २७०० अंकाने कोसळला. गेल्या दोन वर्षांतील ही सर्वात मोठी घसरण ठरली. कोव्हिडच्या दुसऱ्या लाटेने जगभर थैमान घातलेले असतानाही बाजाराने एवढी खालची पातळी गाठली नव्हती.

पाठोपाठ डॉलरच्या तुलनेत रुपयाही घसरला असून, आशियाई चलनांपैकी ते सर्वांत कमकुमत चलन ठरले आहे. गुंतवणुकदारांना एका दिवसात साडेतेरा लाख कोटींचा फटका कालच्या जागतिक घडामोडींनी बसला. लग्नसराई सुरू असताना, सोन्यानेही ५२ हजारांची पातळी गाठत, ऐनवेळी अडचणीत आणण्यात कसूर ठेवलेली नाही. अशा प्रकारे, युद्धभूमी दूर असली, तरी तिचे चटके भारतीयांना बसत आहेत. शीतयुद्धोत्तर काळात भारताची रशियाशी अधिक जवळीक होती. रशियाची शकले झाल्यानंतरच्या काळात अमेरिकेसोबतच्या लष्करी व्यवहारात वाढ होऊनही, अद्याप ५० टक्क्यांच्या आसपास लष्करी सामग्री रशियातून आयात केली जाते. रशिया दुखावला, तर तो चीनच्या बाजूला झुकेल, अशी भीती भारताला सतत असतेच. या पार्श्वभूमीवर, जागतिक राजकारणात यापुढे 'तटस्थ भूमिका' या शब्दाला कितपत अर्थ उरेल, याविषयी अनेकांना शंका वाटते. नव्या परिस्थितीत, कदाचित देशाच्या परराष्ट्र विषयक धोरणाचा फेरविचार करून, 'तटस्थ' ऐवजी 'सुयोग्य' भूमिका घ्यावी लागणार आहे. तशी ती घ्यायची असेल, तर जागतिक राजकारण, डावपेच, स्वदेशाचे हित यांबरोबर आणि भविष्यातील आर्थिक, तांत्रिक घडामोडींचा अंदाज घ्यावा लागेल. यात सगळ्यांचीच कसोटी लागणार आहे.

# अंगडिया व्यावयायिकांकडे खंडणीची मागणी; वरिष्ठ अधिकाऱ्याविरोधात पुराव्यांचा अभाव



मुंबई : कारवाई न करण्यासाठी एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने प्रति महिना १० लाख रुपये मागितल्याची लेखी तक्रार अंगडिया व्यावसायिकांच्या मंडळाने अतिरिक्त पोलीस आयुक्त (दक्षिण प्रादेशिक परिमंडळ) दिलीप सावंत यांच्याकडे केली होती. सावंत यांनी याप्रकरणी तक्रार करून स्वत: खंडणीचा गुन्हा दाखल केला होता. गुन्हे शाखेने एल. टी. मार्ग पोलीस ठाण्यातील दोन अधिकाऱ्यांना अटक केली आहे. पण आरोप करण्यात आलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्याविरोधात अद्याप कोणताही भक्कम पुरावा सापडला नसून त्याच्या सहभागाबाबत तपास सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले.

अंगडिया व्यावसायिकांच्या मूळ तक्रारीनुसार, गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात अंगडिया व्यावसायिकांनी बैठक बोलावली होती. त्यात या अधिकाऱ्याकडून १० लाख रुपये मागण्यात आल्याची चर्चा झाली. त्या वेळी या अधिकाऱ्याला रक्कम न देण्याचे या बैठकीत ठरले. त्यानंतर २ डिसेंबर महिन्यात पोफळवाडी परिसरात एल. टी. मार्ग पोलीस ठाण्यातील पोलीस साध्या वेशात आले व बॅग असलेल्या व्यक्तींना ताब्यात घेऊन चौकीत नेण्यास सुरुवात केली, असे अंगडिया व्यावसायिकांच्या मंडळाने केलेल्या तक्रारीत म्हटले आहे. त्यानंतर ज्यांच्याकडे ५ लाख आहेत त्यांच्याकडे ५० हजार रुपये, ज्यांच्याकडे १० लाख आहेत त्यांच्याकडे एक लाख रुपये मागण्यास सुरुवात केली. त्याचप्रमाणे व्ही. पी. रोड पोलीस ठाण्यातील पोलिसांकडूनही २ डिसेंबर ते ४ डिसेंबर या कालावधीत अंगडिया व्यावसायिकांना ताब्यात घेण्यात आले, असे तक्रारीत म्हटले आहे. या सर्व प्रकारानंतर अंगडिया व्यावसायिकांच्या मंडळाने या वरिष्ठ अधिकाऱ्याची भेट घेतली. त्या वेळी त्याने मला १० लाख रुपये देण्यास सुरुवात करा, मी तुमच्या अडचणी सोडवेन, अशी मागणी केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. त्यावर अंगडिया व्यावसायिकांनी रक्कम देणे शक्य नसल्याचे सांगितल्यावर तेवढी रक्कम तर द्यावी लागेल अन्यथा इतर पोलीस ठाण्यांकडूनही कारवाईला सुरुवात करण्यात येईल, अशी धमकीही देण्यात आल्याचे अंगडिया व्यावसायिकांनी तक्रारीत म्हटले आहे.

काय आहे प्रकरण?

अंगडिया व्यावसायिकांच्या तक्रारीनंतर अतिरिक्त पोलीस आयुक्त दिलीप सावंत यांनी याप्रकरणी तात्काळ चौकशीला सुरुवात केली. या चौकशीत अंगडिया व्यावसायिकांचे, आरोपी पोलिसांचे, साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात आले. सावंत यांनी चौकशीअंती याप्रकरणी एल. टी. मार्ग पोलीस ठाण्यात तक्रार केली. त्यात तीन अधिकाऱ्यांविरोधात खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हे शाखेच्या गुप्तवार्ता विभागाने (सीआययू) चौकशीनंतर एल. टी. मार्ग पोलीस ठाण्यातील सहायक पोलीस निरीक्षक नितीन कदम व उपनिरीक्षक समाधान जमदाडे यांना याप्रकरणी अटक केली.

# कांजुरमार्ग येथे इमारतीला आग, अग्नीशमन दलाच्या 14 गाड्या घटनास्थळी




मुंबई : मुंबई शहरात आगीचे सत्र सुरुच आहे. ताडदेव, करी रोड पाठोपाठ आता कांजुरमार्गमध्येही एका बहुमजली इमारतीला आग (Fire) लागल्याची घटना समोर आली आहे. कांजुरमार्ग येथे एका निवासी इमारतीला सोमवारी दुपारी 1.42 वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागली आहे. इमारतीच्या नवव्या आणि दहाव्या मजल्यावर ही आग लागली असून परिसरात प्रचंड खळबळ माजली आहे. अग्निशामक दलाच्या14 गाडी घटनास्थळी दाखल झाल्या असून आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. एनजी रॉयल अपार्टमेंट (N G Royal Apartment) या इमारतीच्या अकराव्या मजल्यावर आग लागली असून बचाव कार्य सुरु आहे.

**आगीचे कारण अस्पष्ट**

इमारतीतील रहिवाशांना सुखरुप बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरु आहेत. अद्याप कोणत्याही जीविहानीचे वृत्त नाही. मात्र इमारतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. लेवल 2 ची ही आग असून अग्नीशमन दल आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करीत आहे. दरम्यान आगीचे कारण अद्याप कळू शकले नाही. मात्र शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. मात्र तपासानंतरच कारण स्पष्ट होईल.

# अंजली पाटलांना माझं राजकारण संपवायचंय राष्ट्रवादीच्या महिला जिल्हाध्यक्षांचा प्रत्यारोप

बीड : “माझ्या सुनेच्या खांद्यावर बंदूक ठेवून माझं राजकारण संपवण्याचे षडयंत्र रचले जात आहे. माझी सून याबाबत अनभिज्ञ असून आमच्यात कसलाही कौटुंबिक वाद नाही” असा दावा राष्ट्रवादीच्या बीड महिला जिल्हाध्यक्षांनी (Beed NCP) केला आहे. माझे सहकारी पदाधिकारीच कट कारस्थान रचत असल्याचा गंभीर आरोप संगीता तुपसागर (Sangeet Tupsagar) यांनी केला आहे. मानलेल्या आईच्या सांगण्यावरुन भुजंग भुतावळे याने बायकोला मारहाण (Physical Assault) केल्याचा आरोप झाला होता. त्यानंतर सुनेचा छळ केल्याप्रकरणी संगीता तुपसागर यांच्यावर अंबाजोगाई शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडितेचा पती भुतावळे आणि मानलेल्या सासू तुपसागर या दोघांविरुद्ध कौटुंबिक हिंसाचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर तुपसागर यांनी माध्यमांसमोर येऊन सहकाऱ्यांवरच प्रत्यारोप केले आहेत.

संगीता तुपसागर बीड जिल्हा राष्ट्रवादीच्या महिला जिल्हाध्यक्षा आहेत. सुनेचा छळ केल्याप्रकरणी त्यांच्यावर काही दिवसांपूर्वी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. त्यामुळे राजकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली होती. त्यानंतर संगीता तुपसागर यांनी पत्रकार परिषद घेऊन या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**महिला सहकारी पदाधिकाऱ्यांवर आरोप**



अंबाजोगाईच्या राष्ट्रवादी तालुका अध्यक्षा अंजली पाटील यांना माझे राजकरण संपवायचे आहे, त्यामुळे माझ्या सुनेच्या खांद्यावर बंदूक ठेवून मला बदनाम करून माझे खच्चीकरण करण्याचा षडयंत्र आहे. मी काहीही चुकीचे वागले नाही. माझ्यावर खोटा गुन्हा दाखल करण्यात आला. असा आरोप संगीता तुपसागर यांनी केला आहे.

पोलीस अधीक्षांकडे तक्रार कसलीही चौकशी न करता माझ्यावर थेट गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे हा गुन्हा रद्द करण्यात यावा अशी मागणी संगीता तुपसागर यांनी पोलीस अधीक्षक आर राजा यांच्याकडे केली आहे. तसे निवेदन देखील देण्यात आले आहे.

राष्ट्रवादीतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर

राष्ट्रवादीच्या महिला बीड जिल्हाध्यक्षा संगीता तुपसागर यांची निवड झाल्यानंतर अनेक महिला पदाधिकारी नाराज आहेत. तुपसागर ह्या मूळच्या कळंब येथील आहेत. त्यांचे वडील माजी आमदार आहेत. मात्र कमी काळात बीड जिल्ह्यात ठसा उमटवल्याने राष्ट्रवादीकडून त्यांना मोठी जबाबदारी देण्यात आली.

## मुंबईत दुर्दैवी घटना; इमारतीचा भाग कोसळून 5 वर्षांच्या मुलाचा मृत्यू, 3 जखमी



मुंबई: मुंबईत कुर्ला येथे इमारतीचा काही भाग हॉटेलवर कोसळून एका पाच वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. तर इतर तीन जण जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तळमजला अधिक एक मजली इमारत आहे. ही म्हाडाची इमारत असल्याची माहिती आहे.मुंबईतील कुर्ला येथील विनोबा भावे पोलीस ठाण्याजवळील तळमजला अधिक एक मजली इमारतीचा काही भाग तळमजल्यावर असलेल्या हॉटेलवर कोसळला. ही म्हाडाची इमारत आहे. पहिल्या मजल्यावर शॉपिंग सेंटर आहे. या मजल्यावरील काही भाग आज, सोमवारी दुपारी कोसळला. या दुर्घटनेत एका पाच वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती स्थानिकांनी दिल्यानंतर अग्निशमन यंत्रणा, पोलीस, रुग्णवाहिका आणि पालिकेच्या एल विभागाचे कर्मचारी घटनास्थळी मदतकार्यासाठी पोहोचले. त्यांनी तातडीने मदतकार्य हाती घेतले.या दुर्घटनेत चार जण जखमी झाले होते. यात दोन लहान मुले आणि दोन तरूणांचा समावेश आहे.

## जेवणातून विषबाधा, एकाच कुटुंबातील तीन बालकांचा मृत्यू, आईची प्रकृतीही चिंताजनक

बीड : जेवणातून एकाच कुटुंबातील चौघा जणांना विषबाधा झाल्याची दुर्दैवी घटना बीड जिल्ह्यातील बागझरी येथे घडली आहे. या घटनेत आधी दोन चिमुकल्या मुलींचा मृत्यू झाला. त्यापाठोपाठ धाकटा भाऊही दगावला, तर मृत बालकांच्या आईची प्रकृती देखील गंभीर आहे.

बालकांच्या आईवर अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ शासकीय ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



अंबाजोगाई तालुक्यातील बागझरी येथील रहिवासी काशीनाथ दत्तू धारासुरे यांच्या कुटुंबातील ३ बालकांसह पत्नी अशा चार सदस्यांना विषबाधा झाल्याची घटना उघडकीस आली. साधना (वय ६), श्रावणी (वय ४) आणि (८ महिन्याच्या बाळ) अशी मृत बालकांची नावे आहेत. तर, पत्नी भाग्यश्री (वय ३०) यांची देखील प्रकृती चिंताजनक आहे.

अंबाजोगाई तालुक्यातील बागझरीमध्ये ही दुर्दैवी घटना घडली आहे. धारासुरे कुटुंबातील तीन बालकांच्या मृत्यूने गावासह तालुक्यावर शोककळा पसरली आहे. घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.रात्रीच्या जेवणानंतर ही विषबाधा झाली असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून नेमका मृत्यू कशामुळे झाला हे शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होणार आहे.

## धक्कादायक! वसईच्या हॉटेलमध्ये 26 वर्षीय तरुणीची गळा आवळून हत्या




एका २६ वर्षीय तरुणीची गळा आवळून हत्या केल्याची घटना वसईतील पापडी परिसरात असलेल्या एका लॉज मध्ये सोमवारी सकाळी घडली. या प्रकरणी वसई पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला असून या तरुणीच्या सोबत लॉज मध्ये आलेल्या मुलाचा शोध सुरु आहे.

वसईतील पापडी येथे असलेल्या स्टेटस या लॉज मध्ये शनिवारी दुपारी वसई पूर्व वसंत नगरी येथे राहणारे एक तरुण ( २९) आणि तरुणी (२६) आले होते. त्यांनी स्वतःची ओळखपत्रे देऊन येथील खोली भाड्याने घेतली होती. मात्र यातील तरुण हा शनिवारी सायंकाळी त्या खोलीमधून आणि हॉटेल मधून निघून गेला होता. त्यामुळे तरुणी एकटीच खोलीमध्ये होती. रविवारी सकाळपर्यंत या रूम मधून काहीच हालचाल किंवा संपर्क होत नसल्याने हॉटेल चालकाने खोली उघडून पहिले असता तरुणी मृतावस्थेत दिसून आली. त्यामुळे याबाबत तात्काळ वसई पोलिसांना माहिती देण्यात आल्यानंतर पोलिसांनी घटना स्थळी पोहचत पंचनामा केला.

यावेळी या तरुणीची गळा आवळून हत्या करण्यात आल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी अधिक तपास केला असता या तरुणींसह आलेला तरुण शनिवारी निघून गेल्याचे समजले. त्यामुळे प्राथमिक संशय या तरुणावर असून या तरुणाचा शोध सुरु असल्याचे पोलीस उपायुक्त संजयकुमार पाटील यांनी सांगितले. तसेच यासह हॉटेल मध्ये नेमके काय घडले होते याबाबत देखील शोध सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

## पोलिसांना मारहाण; तरुणीला जामीन नाहीच

कर्वेनगर पोलिस चौकीत महिला पोलिस अंमलदाराला शिवीगाळ आणि मारहाण केल्याप्रकरणी तरुणीचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला. अतिरिक्त सत्र न्यायाधीश ए. एन. मरे यांनी हा आदेश दिला. पोलिसांवर झालेल्या हल्ल्याप्रकरणी अटकपूर्व जामीन मंजूर झाल्यास कोणीही कायदा हातात घेऊ शकतो. अशा प्रवृत्तीला सुरुवातीलाच लगाम घालण्याची गरज आहे, असेही न्यायालयाने निकालपत्रात नमूद केले आहे.

संबंधित तरुणीविरोधात वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात सरकारी कामात अडथळा आणणे आणि पोलिसांवर हल्ला केल्याप्रकरणी विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात संबंधित तरुणीने



अटकपूर्व जामीनासाठी सत्र न्यायालयात अर्ज केला होता. या अर्जास अतिरिक्त सरकारी वकील वामन कोळी यांनी विरोध केला.

संबंधित तरुणीने महिला पोलिस अंमलदाराला शिवीगाळ आणि मारहाण केली असून, सहायक निरीक्षकाला धक्काबुक्की केली आहे. हा अत्यंत गंभीर गुन्हा आहे. या तरुणीला कोणाचा तरी पाठिंबा असून, त्यामुळे ती गुन्हा करण्यास धजावली आहे.

घटनेच्या व्हिडिओ चित्रीकरणात तरुणी आक्रमक झाल्याचे दिसत आहे. या घटनेपूर्वी तरुणीने शेजारी राहणाऱ्या महिलेला मारहाण केली. पोलिस घटनास्थळी गेले असता, तिने स्वत:च्या अंगावर कुंकू आणि पाणी ओतून रक्तबंबाळ झाल्याचे भासविले.

## लैंगिक अत्याचाराचे गुन्हे सर्वाधिक

करोनाकाळात हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ झाली असली, तरी ठाणे जिल्ह्यात २०२०-२१ मध्ये महिलांविरोधातील गुन्ह्यांमध्ये सर्वाधिक गुन्हे हे लैंगिक अत्याचाराचे असल्याचे आकडेवारीवरून समोर आले आहे. ठाणे जिल्ह्यात गतवर्षी लैंगिक अत्याचाराच्या ५४० गुन्ह्यांची नोंद झाली आहे. त्यापाठोपाठ अपहरणाचे ४३४ गुन्हे नोंदवले गेले आहेत. यासह बलात्कार, हुंडाबळी, अनैतिक व्यापाराच्या गुन्ह्यांचा आकडाही मोठा असून आजच्या काळातही महिलांवरील अत्याचार कमी



होत नसल्याचे वास्तव समोर येत आहे.

महिलांच्या सुरक्षितेसाठी अत्याधुनिक यंत्रणा, समाजजागृती आणि कायद्याचा आधार असला, तरी अद्यापही महिलांविरोधातील गुन्ह्यांच्या रूपाने विकृतीचे अस्तित्व कायम आहे. कौटुंबिक अत्याचार, लैंगिक छळ, हुंडाबळी, अपहरण अशा घटनांचा आकडा मोठा असल्याचे दिसत आहे.

पोलिस दलात मनुष्यबळाचा अभाव तसेच दररोज पोलिसांवर असलेला ताण कमी करण्यासाठी केंद्र सरकारच्या वतीने महिला पोलिस स्वयंसेवक योजना राबविण्यात येणार होती. मात्र अद्यापही याबाबत कोणत्याच उपाययोजनांची अंमलबजावणी झालेली दिसून येत नाही.

सर्वाधिक गुन्हे ठाणे शहरात

पूर्वी महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांची संख्या ही ग्रामीण भागात सर्वाधिक असायची. मात्र आता परिस्थिती उलट झाल्याचे दिसून येत आहे. महिलांवरील लैंगिक अत्याचार तसेच अपहरणाच्या सर्वाधिक घटना या ठाणे शहरात घडल्याचे विविध तालुक्यांमधील गुन्ह्यांच्या आकडेवारीवरून दिसत आहे.

## आधी सीएनजी स्टेशनचे लाईट बंद केले

### मग मॅनेजरसह तिघांचा खून




नवी दिल्ली : राजधानी दिल्लीला लागून असलेल्या गुरुग्राममधील सीएनजी स्टेशनवर (Gurugram CNG Station) तीन तरुणांची हत्या झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. ही घटना रविवारी मध्यरात्री 3 वाजता घडली आहे. राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या सेक्टर 31 येथील सीएनजी पंपावर अज्ञात चोरट्यांनी तिघा तरुणांची चाकूने भोसकून हत्या केली. हत्येनंतर हल्लेखोर पळून गेले. पुष्पेंद्र, भूपिंदर आणि नरेश अशी मृत तरुणांची नावे आहेत. तिघेही तरुण उत्तर प्रदेशचे (Uttar Pradesh) रहिवासी होते.

**काय आहे प्रकरण?**

पोलिसांनी तिघांचे मृतदेह ताब्यात घेऊन पोस्ट मार्टमसाठी पाठवले आहेत. पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले की, आम्हाला पहाटे तीन वाजता सीएनजी पंपावर एका तरुणाचा मृतदेह सापडल्याची माहिती मिळाली होती.


## मुंबईसह 'या' रेल्वे स्थानकांबाहेर तंबाखुजन्य पदार्थांचे सेवन केल्यास पडेल महागात



नागपूर : राज्यातच काय तर एकंदरीत देशभराचा विचार केला तर तरुणांमध्ये नशेचं प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. जागोजागी हल्ली टपऱ्या आणि दारुची दुकानं आपल्याला सहज पाहायला मिळतात. कितीही नो स्मोकिंगचे बोर्ड लावले तरी यातून सुधारणा होत असल्याचं दिसलं नाही. त्यामुळे आता प्रशासनाने वेगळ्या पद्धतीने कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. रेल्वेगाड्या किंवा रेल्वेस्थानक परिसरात सिगारेट किंवा अन्य तंबाखुजन्य पदार्थांचे सेवन करणाऱ्यांविरुद्ध मध्य रेल्वेने धडक कारवाई सुरू केली आहे. त्याअंतर्गत २४ व २५ फेब्रुवारी रोजी १६० जणांकडून २९ हजार ७०० रुपयांचा दंड वसूल केला आहे. मध्य रेल्वेच्या मुंबई, पुणे, सोलापूर, भुसावळ व नागपूर विभागात ही कारवाई सुरू करण्यात आली आहे.

रेल्वे कायद्यानुसार गाड्या तसेच रेल्वेस्थानक परिसरात तंबाखुजन्य पदार्थांचे सेवन करणे, सिगारेट ओढणे याला बंदी आहे. मात्र, तरीही अनेक प्रवाशी त्याकडे दुर्लक्ष करून या नियमाचे सर्रास उल्लंघन करीत असतात. याचा अन्य प्रवाशांना त्रास तर होतोच; शिवाय सिगारेटमुळे गाडीत आग लागण्याचाही धोका असतो. त्यामुळेच ही कारवाई सुरू करण्यात आली आहे. या दोन दिवसांत नागपूर विभागात अशाप्रकारे धूम्रपान करताना आढळलेल्या ३७ प्रवाशांकडून ७ हजार ४०० रुपये दंड वसूल करण्यात आला. सुरक्षित प्रवासासाठी प्रवाशांनी असे प्रकार टाळावे, असे आवाहन मध्य रेल्वे प्रशासनाने केले आहे.

## धक्कादायक! बीडच्या बेलेश्वर संस्थानाच्या मठाधिपतींना धमकीचा फोन




बीडः बीडमध्ये खंडणीसाठी चक्क मठाधिपतींसह डॉक्टरला जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार समोर आला आहे. एकाच खंडणीखोराने बीडच्या नेकनूर परिसरातील बेलेश्वर संस्थानच्या मठाधिपतींना व लिंबागणेश येथील डॉक्टरांकडे खंडणीची मागणी केली आहे.

बीड तालुक्यातील लिंबागणेश परिसरात बेलेश्वर संस्थान आहे. या संस्थानाचे मठाधिपती भारती महाराज व लिंबागणेश येथील डॉ. सचिन जायभाये या दोघांना एकाच नंबरवरून अज्ञात व्यक्तीचा फोन आलाय. पहिल्यांदा भारती महाराज यांना फोन करून 'चार लाख रुपये द्या' अन्यथा आम्हाला तुमच्या खुनाची सुपारी मिळाली असल्याचे खंडणीखोर म्हणाला. त्यानंतर थोड्याच वेळात डॉ. सचिन जायभाये यांना त्याच व्यक्तीने फोन करून ४५ लाखांची खंडणी मागितली. पैसे न दिल्यास तुमच्या हत्येची सुपारी मला मिळाली असल्याचं देखील तो यावेळी म्हणाला. तर या प्रकारांमुळे भीतीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान याप्रकरणी नेकनूर पोलीस ठाण्यात रविवारी गुन्हा दाखल करण्यात आलाय.

मात्र, अशा खंडणीखोरांना पोलीस प्रशासनाने लवकरात लवकर ताब्यात घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी अशी देखील मागणी जनतेतून पुढे येत आहे. मात्र, बीड जिल्ह्यात नेमकं चाललं काय अनेक घटना बीड जिल्ह्यात घडत आहे. याकडे नेमकं पोलीस प्रशासन का दुर्लक्ष करत आहे. असाही प्रश्न जनतेतून उभारताना पाहायला मिळतोय. बीड जिल्ह्यात गेल्या महिनाभरात खून गोळीबार अशा घटना घडतच आले आहेत. मात्र पोलीस प्रशासन शांत का? हाच एक विचार करण्यारा प्रश्न जनतेसमोर उभा आहे.

## धक्कादायक! पोत्यात बांधलेल्या अवस्थेत आढळला मृतदेह

हिंगोली : हिंगोली जिल्ह्यातल्या सेनगाव तालुक्यातील पान कनेरगाव ते वाढवणा शिवारात एका शेतातील विहिरीमध्ये पोत्यामध्ये बांधलेल्या अवस्थेत मृतदेह आढळल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. सदरील घटना ही आज दुपारच्या सुमारास उघडकीस आली तर असल्याची माहिती माहिती मिळताच स्थानकाचे पोलीस भोईटे यांच्यासह घटनास्थळाकडे



पोलीस तपास सुरू आहे.घटनेची सेनगाव पोलीस निरीक्षक रंजीत पथक रवाना झाले. त्याच बरोबर मृतदेह पाहण्यासाठी आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांनी देखील मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. सदरील इसमाचा मृतदेह पोत्यात बांधून पाण्यात फेकले यामुळे, त्याचा चेहरा देखील ओळखणे कठीण झाले आहे.

## पेट्रोल भरण्यावरून सोलापुरात पंपावर तुफान राडा; मारहाण सीसीटीव्हीत कैद



सोलापूर: सोलापुरातील डफरिन चौकात सुपर पेट्रोल पंपावर रविवारी रात्री तुफान राडा झाला. पंपावर पेट्रोल भरण्याच्या कारणावरून एका युवकाला दुसऱ्या काही युवकांनी बेदम मारहाण करून त्याच्या गाडीची तोडफोड करत पेट्रोल पंपाचेही नुकसान केले आहे. त्याशिवाय पंप कर्मचाऱ्यांनाही मारहाण केल्याची घटना घडली आहे. ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे.

सुपर पेट्रोल पंपावर रात्री सव्वा नऊच्या सुमारास पेट्रोल भरण्याचे काम चालू होते. यावेळी दोन युवक गाडी घेऊन पेट्रोल भरण्यासाठी आले. त्यांनी बळजबरीने रांगेत न थांबता पेट्रोल भरण्यासाठी कर्मचाऱ्याला दम भरला. तेव्हा रांगेत थांबलेल्या एका युवकाने त्यांना हटकले. याचा राग मनात धरून त्या युवकाला पाच ते सहा युवकांनी बेदम मारहाण केली. त्याच्या गाडीची मोडतोड केली तसेच मध्यस्थी करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाही ही मारहाण करण्यात आल्याची माहिती मॅनेजर राहुल व्हनसुरे यांनी माध्यमांना दिली आहे. दरम्यान, या वादाचे मूळ काय, राडा करणारे कुठले होते याचा शोध सदर बझार पोलीस घेत आहेत. सीसीटीव्ही आधारे ओळख पटविण्याचे काम सुरू आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्कः-9594418181 / 8424989898